UGC CARE LISTED
VENUTAI CHAVAN COLLEGE Estd. 1st May 1971 KARAD

ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

पुरवणी अंक १५ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : १५

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- डॉ. हेमलता काटे
- डॉ. एस. एस. पवार
- डॉ. विनायक राऊत

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

प्रभारी प्राचार्य
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

VENUTAI CHAVAN COLLEGE Estd. 1st May 1971 KARAD

२१. वातावरणातील बदल आणि शेती

- प्रा सुरेश जोती पाटील ---------- १०१

२२. शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे महत्त्व – एक विवेचनात्मक अभ्यास

- श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे ---------- १०५

२३. भारतातील सेवा क्षेत्र आणि शाश्वत विकास

- डॉ. जयदीप उत्तमराव दीक्षित ---------- १०९

२४. कोल्हापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे आणि पर्यटन विकास : एक ऐतिहासिक अभ्यास

- आशाताई राजाराम मदने ---------- ११२

२५. वारकरी संप्रदायातील वारीच्या माध्यमातून होणारे समाज व पर्यावरण जागृती : एक अभ्यास

- १) सोनवणे अंकुश भागवत, २) प्रा.डॉ.सखाराम पंढरीनाथ टकले ---------- ११६

२६. राजकीय दृष्टिकोनातून शाश्वत विकास विशेष संदर्भ: कराड

- तृप्ती रमेश मोरे ---------- १२०

२७. संत तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार : एक दृष्टिक्षेप

- लक्ष्मण गजानन गणगे ---------- १२४

२८. चाकणच्या ब्रह्मे घराण्यास मिळालेले धार्मिक इनाम

- प्रा. डॉ. गोर्डे विलास सोमा ---------- १२७

२९. मधुमेह नियंत्रणास भरड धान्याचे महत्त्व

- प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे ---------- १३१

३०. भारतातील प्रादेशिक राजकीय पक्षाचा प्रभाव

- प्रा.डॉ. कल्पना एस. गोडघाटे ---------- १३४

३१. कवयित्री मालती सेमले यांच्या 'बालविश्वाची फुललेली बाग'

- १) संगिता उमाकांत घोडेस्वार, २) डॉ विद्याधर बन्सोड ---------- १३७

३२. महिलांच्या आहार विषयक सवयींवर पोषण शिक्षणाचा प्रभाव

- प्रा. नितु जिवनराव शेंडे ---------- १४२

ISSN No. 2394-5990

# शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे महत्त्व - एक विवेचनात्मक अभ्यास

**श्रीमती तेजश्री तानाजी सरकाळे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
ई-मेल-tejashrisarkale123@gmail.com
Mob :-9673753639

VENUTAI CHAVAN COLLEGE Estd. 1st May 1971 KARAD

**सारांश :**

शाश्वत विकास हा सतत निरंतर चालत राहणारी प्रक्रिया आहे.वर्तमान काळापासून भविष्य काळापर्यंत अविरत सुरू असणारी प्रक्रिया आहे.आजच्या युगात विकासासाठी मनुष्य नैसर्गिक, भौतिक संसाधनाचा अमाप उपयोग करत आहे.हा केला जाणारा वापर मनुष्याने विवेकबुद्धीने करणे आवश्यक आहे.ज्यामुळे मनुष्याला आपल्या भावी पिढीकडे ही संसाधने योग्य पद्धतीने हस्तांतरित करता येणे शक्य होईल.वर्तमानामध्ये पर्यावरण संरक्षण संवर्धन झाले तरच,आपण भावी पिढीला एक पोषक पर्यावरण उपलब्ध करून देऊ शकतो. आजचा आर्थिक विकास हा निश्चितपणे नैसर्गिक संसाधनाला पर्यावरणाला तसेच वातावरणातील प्रदूषण वाढीला कारणीभूत ठरणारा आहे.

भारताला शाश्वत विकास टिकून ठेवण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे,परंतु या समस्यांना समूळ नष्ट करण्यासाठी आपणाकडे उपाययोजना देखील उपलब्ध आहेत.या उपायोजनांमध्ये सरकार आणि लोकसहभाग असेल तरच, आपण समस्यांचे योग्य निराकरण करू शकतो.शाश्वत विकासाबरोबरच पर्यावरण संवर्धन व संरक्षण देखील तितकेच महत्त्वपूर्ण आहे.यामध्ये देखील लोकांचा सहभाग असणे गरजेचे आहे.शाश्वत विकास या व्यापक संकल्पनेचे महत्त्व आजच्या युगात समजणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रस्तावना :**

जग देश आणि समाज यांचा केंद्रबिंदू हा मानव प्राणी आहे. मनुष्याने आपल्या उत्पत्तीपासूनच सतत परिवर्तनाच्या प्रक्रियेचा सामना केला आहे. मनुष्य स्वतः परिवर्तनशील प्राणी असून वेळेनुसार होणाऱ्या प्रत्येक बदलांमध्ये त्याने स्वतःला सामावून घेतले आहे. मनुष्याने वातावरणातील बदलानुसार स्वतःच्या क्षमता विकसित केले आहेत. मानवाच्या याच प्रवृत्तीमुळे त्याच्यामध्ये विकासाला वाव निर्माण झाला आहे. मनुष्य हा सतत स्वतःसाठी समाजासाठी सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी प्रयत्नशील आहे. या सर्व प्रक्रियांमध्ये मनुष्याचा आर्थिक विकास होणे सर्वाधिक महत्वपूर्ण आहे. आर्थिक विकासाला देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक देशातील सरकार आपल्या देशपाशयांच्या आर्थिक विकास आणि वृद्धीसाठी नेहमीच प्रयत्नशील असते. परंतु हा आर्थिक विकास पर्यावरणाला हानिकारक असू नये, जर असे असेल तर तो विकास मनुष्याच्या जीवितला धोकादायक ठरू शकतो. कारण जर पर्यावरण टिकले नाही, तर मनुष्य प्राणी देखील भूतलावर तग धरू शकणार नाहीत. त्यामुळे विकास होत असताना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन हे सर्वात मोठे आव्हान असणार आहे.आज विकासाच्या धावपळीत पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. त्यामुळेच आवश्यकता आहे, ती विकासाबरोबर पर्यावरण संवर्धन होणे. तरच त्या विकास प्रक्रियेला आपण शाश्वत विकास असे म्हणू शकतो.

**उद्दिष्टे :**

१. शाश्वत विकास या संकल्पनेच्या अर्थाचा अभ्यास करणे.
२. शाश्वत विकासाचे महत्त्व समजून घेणे.
३. शाश्वत विकासाची सद्यस्थिती आणि त्यासमोरील आव्हाने याची माहिती समजून घेणे.
४. शाश्वत विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**शाश्वत विकासाची आवश्यकता :**

विकासाच्या वेगामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधनांचा वापर केला जात आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणात होत आहे. नैसर्गिक संसाधने आपली अनमोल संपत्ती आहे. या संपत्तीचा नाश हा विकासामध्ये वाढ झाल्यावर होत असतो. प्रत्येक मनुष्याची जबाबदारी आहे की, त्याने पर्यावरणातील नैसर्गिक संसाधनाचा वापर मर्यादित स्वरूपात केला पाहिजे. जमिनीचा वापर हा शेतीसाठी मानवाच्या मर्जीनुसार होत असतो. त्यामुळे अधिकाधिक उत्पादन मिळवण्यासाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत आणि उत्पादकता कमी होत



57